# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.12.2025** **वारःमंगळवार**

---

1. वंदे मातरम हे भारतीयांच्या संकटांशी सामना करण्याच्या ताकदीचं प्रतीक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. विमान वाहतुकीबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही-केंद्रीय विमान वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांची राज्यसभेत ग्वाही
3. श्रमिकांचे आधारस्तंभ बाबा आढाव यांचं पुण्यात वृद्धापकाळानं निधन आणि
4. भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेला आजपासून सुरुवात.

**मोदी-वंदे मातरम्**

भारत आणि भारतीयांमध्ये प्रत्येक प्रश्न, प्रत्येक संकटाचा सामना करण्याची ताकद आहे, आणि वंदे मातरम् हे गीत त्या ताकदीचं प्रतीक आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल लोकसभेत केलं. 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताला दीडशे वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त लोकसभेत एक विशेष चर्चा झाली, त्यावेळी मोदी बोलत होते. 'वंदे मातरम्' हे केवळ एक गीत नाही, तर ते भारतीयांच्या मनात वसलेलं समृद्ध भारताचं चित्र आहे, असं मोदी म्हणाले. यावेळी पंतप्रधानांनी वंदे मातरमच्या दीडशे वर्षांच्या इतिहासाचा मागोवा घेतला. तसंच काँग्रेसच्या धोरणांवर टीका केली. या चर्चेत भाग घेताना कॉंगेस नेत्या प्रियांका गांधी वद्रा यांनी वंदे मातरम् हा राष्ट्राचा आत्मा असल्याचं सांगितलं. सरकार यावरून राजकारण करत असून लोकांचं लक्ष त्यांच्यापुढील मुख्य प्रश्नांपासून दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप प्रियंका गांधी यांनी केला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, कॉंग्रेस नेते गौरव गोगोई यांनीही या चर्चेत भाग घेतला.

**संसद**

विमान वाहतूक ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असून त्याच्या सुरक्षेबद्दल कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असं केंद्रीय विमान वाहतूकमंत्री राममोहन नायडू यांनी म्हटलं आहे. ते काल राज्यसभेत पुरवणी प्रश्नाला उत्तर देत होते. उड्डाणं रद्द का झाली याची चौकशी सरकार करत आहे. सरकारनं हे प्रकरण गांभीर्याने घेतलं असून यात दोषी असणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असं नायडू म्हणाले. देशाला किमान पाच मोठ्या विमान कंपन्यांची गरज आहे. त्यासाठी मंत्रालय प्रयत्नशील असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**रद्द**

दरम्यान, इंडिगो विमान सेवेच्या गोंधळानंतर 1 ते 7 डिसेंबर या कालावधीतील विमानांची सुमारे 6 लाख तिकिटं रद्द झाली आहेत. या प्रवाशांचे 827 कोटी रुपये परत केल्याची माहिती इंडिगो या हवाई वाहतूक कंपनीनं दिली आहे. काल, कंपनीनं सुमारे 1800 उड्डाणं केली आणि त्यातली 91 टक्के उड्डाण वेळेवर झाली, असं कंपनीनं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. 9 हजार बॅगांपैकी साडेचार हजार बॅगा प्रवाशांच्या नियोजित पत्त्यावर पोहोचवण्यात आल्या असून उर्वरीत बॅगा पुढच्या 36 तासांत परत केल्या जातील, असंही या निवेदनात म्हटलं आहे.

**आरोग्य विधेयक**

'आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा अधिभार विधेयक, 2025' या विधेयकाला काल संसदेची मंजुरी मिळाली. चर्चेनंतर राज्यसभेनं हे विधेयक लोकसभेत परत पाठवलं. गेल्याच आठवड्यात या विधेयकाला लोकसभेची मंजुरी मिळाली होती. हा

उपकर अनुचित वस्तूंवरच लागू होणार असून याचं स्वरुप, उत्पादन शुल्क प्रकारचं नसेल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल राज्यसभेत विधेयक मांडताना स्पष्ट केलं. गुटखा आणि पान मसाल्यावर बंदी लादण्याची मागणी काँग्रेस खासदार शक्तीसिंह गोहिल यांनी या विधेयकावरच्या चर्चेदरम्यान केली. शिवसेना खासदार मिलिंद देवरा यांनी मद्यपानाच्या वाढत्या प्रमाणावर चिंता व्यक्त केली.

**सीतारामन**

अनधिकृत डिजिटल कर्ज ॲप्सच्या व्यवहारांना आळा घालण्यासाठी सरकार सातत्यानं रिझर्व्ह बँकेच्या संपर्कात असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल लोकसभेत सांगितलं. रिझर्व्ह बँकेनं यंदा 1 जुलैपासून त्यांच्या संकेतस्थळावरलोकांच्या माहितीसाठी डिजिटल कर्ज देणाऱ्या ॲप्सची सूची उपलब्ध केली आहे. रिझर्व्ह बँकेकडे नोंदणीकृत बँका आणि इतर वित्तीय संस्थांच्या डिजिटल कर्ज ॲप्सचा त्यात समावेश आहे. अनधिकृत डिजिटल कर्ज ॲप्स ब्लॉक करण्याचे निर्देश देण्याचे अधिकार इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला दिले आहेत, असं अर्थमंत्र्यांनी सांगितलं.

**संसद**

दरम्यान, लोकसभेमध्ये आज निवडणूक सुधारणांच्या मुद्द्यावर चर्चा होणार आहे. राज्यसभेत राष्ट्रगीत 'वंदे मातरम'च्या 150 व्या वर्धापन दिनानिमित्त चर्चा होणार आहे.

**घटना**

राजकीय पक्षांनी त्यांच्या पक्षाच्या घटनेची अद्ययावत प्रत 30 दिवसांच्या आत सादर करावी, अशी सूचना निवडणूक आयोगानं काल केली. पक्षांची उद्दिष्टं आणि लोकशाही पद्धतीनं चालण्यासाठी आवश्यक त्या प्रक्रियांची माहिती देणारा हा दस्तावेज महत्त्वाचा असून तो जमा करणं सर्व राजकीय पक्षांना बंधनकारक आहे, असं आयोगानं पक्षप्रमुखांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. या घटना आयोगाच्या संकेतस्थळावर अपलोड केल्या जातात.

**राज्य-विधिमंडळ**

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजाला काल नागपुरात 'वंदे मातरम्' या राष्ट्रगानानं तसंच 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्य गीतानं सुरुवात झाली. त्यानंतर 'वंदे मातरम्' गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त वंदे मातरम्चं संपूर्ण गायन करण्यात आलं. हिवाळी अधिवेशनाच्या कालच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारनं 75 हजार 286 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. त्यातले 15 हजार 648 कोटी रुपये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी राखीव आहेत. लाडकी बहीण योजनेसाठी 6 हजार कोटींहून अधिक तर मनरेगासाठी साडे तीन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी तीन हजार कोटी रुपये तर एसटी महामंडळासाठी दोन हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत.

**बाबा आढाव-निधन**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि कष्टकरी आणि श्रमिकांचे आधारस्तंभ बाबा आढाव यांचं काल पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. ते 95 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारादरम्यान काल त्यांचं निधन झालं. बाबा आढाव यांचा पार्थिव देह आज सकाळी 10 वाजता अंत्यदर्शनासाठी हमाल भवन इथं ठेवण्यात येईल. संध्याकाळी 4 वाजता त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. बाबा आढाव यांनी शेतमजूर, हमाल आणि असंघटित कामगारांच्या हक्कासाठी आजीवन संघर्ष केला. हमाल पंचायत या संघटनेची स्थापना करुन त्यांना सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्यासाठी ते कार्यरत होते. जातीभेदाविरुद्ध एक गाव एक पाणवठा ही चळवळ त्यांनी संपूर्ण राज्यात राबवली. आपलं संपूर्ण आयुष्य कष्टकरी श्रमिकांच्या हक्कांसाठी, समाजासाठी वेचणाऱ्या बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून दुःख व्यक्त करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, ज्येष्ठ नेते शरद पवार, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बाबा आढाव यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**वाजपेयी व्याख्यान**

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातर्फे आज नवी दिल्ली इथं पाचव्या अटलबिहारी वाजपेयी स्मृति व्याख्यानाचं आयोजन करण्यात आलं आहे. सिंगापूरच्या पंतप्रधानांचे वरिष्ठ सल्लागार तेओ ची हीन 'बदलत्या जगातील शाश्वत भागीदारी' या विषयावर व्याख्यान देतील, असं मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. परराष्ट्र व्यवहारमंत्री आणि पंतप्रधान म्हणून भारताच्या परराष्ट्र धोरणाला आकार देण्यामध्ये आणि पर्यायानं एकंदर राष्ट्र उभारणीमध्ये वाजपेयी यांनी दिलेल्या योगदानाबद्दल अटलबिहारी वाजपेयी यांना आदरांजली म्हणून ही वार्षिक स्मृति व्याख्यानमाला आयोजित केली जाते.

**नवी रेल्वे**

तिरुपती आणि साईनगर शिर्डीला जोडणाऱ्या नवीन जलदगती रेल्वेगाडीला आज केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव हिरवा झेंडा दाखवून रवाना करणार आहेत. उद्घाटन सकाळी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून होणार असल्याचं दक्षिण मध्य रेल्वेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. गाडीची नियमित साप्ताहिक सेवा 14 डिसेंबरपासून सुरू होणार असून तिरुपती इथून दर रविवारी पहाटे 4 वाजता गाडी निघेल आणि साईनगर शिर्डी इथून दर सोमवारी संध्याकाळी 7 वाजून 35 मिनिटांनी रवाना होईल, असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

**बैठक**

युक्रेन प्रश्नावर चर्चा करण्यासाठी आज संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतर्फे खुल्या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. डिसेंबरमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळणाऱ्या संयुक्त राष्ट्रांमधील स्लोव्हेनियाच्या स्थायी मिशनच्या वृत्तसेवेनं ही माहिती दिली आहे.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिणआफ्रिका यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे.सलामीचा सामना आज संध्याकाळी सात वाजता ओडिशातल्या कटक इथल्या बाराबती मैदानावर खेळण्यात येणार आहे. यामालिकेतील दुसरा सामना गुरुवारी चंदीगडमधील मुल्लानपूर इथं तर तिसरा सामना धर्मशाळा इथं, चौथा सामना लखनऊमध्ये आणि शेवटचा सामना अहमदाबादमधीलनरेंद्र मोदी मैदानावर होईल.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.